ज्ञानदीप मिटवी अज्ञान

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग

# समग्र शिक्षा

# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

निपुण भारत

आज़ादी का अमृत महोत्सव

जा.क्र.मप्राशिप/सशि/संगणक/ VSK/२०२२-२३/2984 दिनांक: 03 NOV 2023

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व
२. शिक्षणाधिकारी (प्राथ. व माध्य.), जि.प. सर्व
३. शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, म.न.पा. सर्व
४. शिक्षण निरीक्षण, मुंबई (पश्चिम, उत्तर व दक्षिण)

विषय : विद्या समीक्षा केंद्रांतर्गत Attendance Bot (चॅटबॉट) वर विद्यार्थ्यांची ऑनलाइन उपस्थित्ती नोंदविणेबाबत...

संदर्भ : १) राष्ट्रीय कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांक (PGI) अहवाल २०२२
२) केंद्र शासनाचे पत्र D.O.No.२०-२०/२०२२-IS.१, दि.३०/०६/२०२२

उपरोक्त विषयान्वये, शिक्षण क्षेत्रातील माहिती संकलन व विश्लेषण प्रक्रिया अधिक वेगवान व सुलभ व्हावी. तसेच धोरणकर्ते, शिक्षक आणि सर्व स्तरावरील प्रशासकांसह विविध भागधारकांना डेटा विश्लेषणासाठी एकत्रित व्यासपीठ प्रदान करावे व त्याआधारे राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर गरजा लक्षात घेऊन उपक्रम / योजना आखण्यास मदत व्हावी, याकरिता महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई अंतर्गत समग्र शिक्षा उपकार्यालय, पुणे येथे विद्या समीक्षा केंद्र (VSK) कार्यान्वित करण्यात आले आहे.

सदर विद्या समीक्षा केंद्र, पुणे मार्फत सदर Attendance Bot (चॅटबॉट) च्या वापरासंबंधी विभाग, तालुका व केंद्र स्तरापर्यंत सर्व शिक्षकांना प्रशिक्षण यापूर्वीच देण्यात आलेले आहे. त्याप्रमाने स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळेतील इ.१ ली ते इ.१० वीच्या इयत्तेतील विद्यार्थी उपस्थिती SwiftChat या Application मधील Attendance Bot द्वारे ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्याची प्रक्रिया दि.०१ डिसेंबर २०२३ पासून सुरु करण्यात येत आहे.

तरी आपल्या अधिनस्त सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांना या Attendance Bot (चॅटबॉट) वर विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदविण्यासाठी आदेशित करावे. तसेच सदर उपस्थिती नियमितपणे नोंदविली जात असल्याबाबत आपल्या स्तरावरून नियमितपणे आढावा घेण्यात यावा.

सोबत : मार्गदर्शक सूचना

(प्रदीपकुमार डांगे भा.प्र.से.)
राज्य प्रकल्प संचालक
म. प्रा. शि. प. मुंबई

प्रत माहितीस्तव सविनय सादर
१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, पुणे

प्रत कार्यवाहीस्तव :
१. मा. आयुक्त, मनपा, सर्व
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सर्व
३. शिक्षण संचालक (प्राथ. व माध्य.), शिक्षण संचालनालय, पुणे

# विद्यार्थी ऑनलाइन उपस्थित्ती - मार्गदर्शक सूचना

१. Google play store वरून SwiftChat हे Application download करावे.

२. प्रशिक्षणात दिलेल्या सुचनेनुसार SwiftChat या Application मधील Attendance Bot (चॅटबॉट) द्वारे इयत्ता १ ली ते १० वीच्या वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदवावी.

३. उपस्थिती नोंदविताना शिक्षकांनी आपल्या शाळेचा यु-डायस कोड व स्वतःच्या शालार्थ आय.डी. चा वापर करावा.

४. शिक्षकांनी शालार्थ पोर्टलवर नोंदविलेला मोबाईल क्रमांकच वापरावा. आपला मोबाईल क्रमांक बदलला असल्यास शालार्थ पोर्टलवर तो अपडेट करावा.

५. सद्यस्थितीत जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, अनुदानित शाळेतील शालार्थ आय.डी. उपलब्ध असलेल्या शिक्षकांना या Attendance Bot (चॅटबॉट) वर विद्यार्थी उपस्थिती नोंदविता येईल. सेवार्थ व इतर प्रणालीमध्ये वेतन असणाऱ्या शिक्षकांना Attendance Bot (चॅटबॉट) वर विद्यार्थी उपस्थिती नोंदविण्याबाबत स्वतंत्रपणे अवगत करण्यात येईल.

६. एखाद्या शाळेतील एखाद्या वर्गाची तुकडी विनाअनुदानित असेल, तर त्या वर्गातील विद्यार्थ्यांची उपस्थिती त्याच शाळेतील अनुदानित शिक्षकाचा शालार्थ आय.डी. द्वारे नोंदविण्यात यावी.

७. काही शिक्षकांना Attendance Bot (चॅटबॉट) द्वारे उपस्थिती नोंदविताना शालार्थ आय.डी. मध्ये अडचणी येत असतील, तर त्यांनी आपल्याच शाळेतील इतर शिक्षकाच्या शालार्थ आय.डी. चा वापर करून विद्यार्थ्यांची उपस्थिती स्वतः नोंद करावी.

८. विद्यार्थी उपस्थिती नोंदविताना तांत्रिक अडचणी येत असल्यास शालार्थ पोर्टल, सरल पोर्टल व यु-डायस या सर्व पोर्टलमधील माहिती अपडेट करावी. सदर सर्व पोर्टल अपडेट झाल्यानंतर अशा अडचणी दूर होण्यास मदत होणार आहे.

९. या Attendance Bot (चॅटबॉट) वर दोन सत्रात भरणाऱ्या शाळांसाठी सकाळी ७.०० ते दु.१२.०० तर अन्य शाळांसाठी सकाळी १०.०० ते सायं. ०५.०० या कालावधीत विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची नोंद करावी.

१०. उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), समग्र शिक्षा हे विद्या समीक्षा केंद्राचे जिल्हा नोडल अधिकारी म्हणून कामकाज पाहतील. विद्यार्थ्यांची यांची दैनंदिन उपस्थिती Attendance Bot (चॅटबॉट) वर नियमितपणे नोंदविली जात असल्याबाबत जिल्हा नोडल अधिकारी आपल्या स्तरावरून आढावा घेतील.

११. ऑनलाईन उपस्थिती नोंदविताना येणाऱ्या अडचणी **https://tinyurl.com/AttendanceBot** या लिंकवर सादर कराव्यात.